महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : २९

# महाराजा सयाजीराव आणि बौद्ध धर्म

## सौरभ गायकवाड




महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,

११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४

Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : २९

# महाराजा सयाजीराव आणि बौद्ध धर्म

सौरभ गायकवाड

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव
आणि बौद्ध धर्म
इतिहास
सौरभ गायकवाड
●
प्रकाशन क्रमांक - ४९
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : सौरभ गायकवाड
महाडीक कॉलनी, मु.पो. - टोप
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर
पिन कोड - ४१६१२२
९१७५००१८६२
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : २७ रुपये

---

● मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
● या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
● **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
● **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# महाराजा सयाजीराव आणि बौद्ध धर्म

बाबासाहेबांनी आधुनिक भारताला बौद्ध धर्म परिचित करून दिला हे आपण जाणतोच. परंतु बाबासाहेबांनी बौद्ध धर्म स्वीकारण्याच्या ५८ वर्षे अगोदर सयाजीराव महाराजांनी या क्षेत्रात करून ठेवलेले पायाभूत काम महाराजांच्या इतर कामाप्रमाणेच इतिहासाच्या पोटात 'गडप' झाले आहे. भारताचा सांस्कृतिक इतिहास विचारात घेता यात आश्चर्यकारक असे काहीच नाही. या पार्श्वभूमीवर "महाराजा सयाजीराव आणि बौद्ध धर्म" यांच्यातील नाते सांगणारे जे नवे संदर्भ पुढे येत आहेत ते संदर्भ आपले बौद्धिक आरोग्य सुदृढ करण्यासाठी फलदायी ठरतील.

रोमेश चंद्र दत्त यांच्या १८९३ मध्ये प्रकाशित झालेल्या 'History of Civilization In Ancient India' या ग्रंथामधील बुद्धासंदर्भातील वृत्तांत वाचून कृष्णराव अर्जुन केळूस्कर यांना 'बुद्धचरित्र' लिहिण्याची प्रेरणा मिळाली होती. याच रोमेश चंद्र दत्त यांना १८९५ मध्ये सयाजीराव महाराजांनी ब्रिटीश

सरकारच्या सेवेतून बडोदा संस्थानच्या सेवेत येण्याचे निमंत्रण दिले होते. परंतु काही कारणास्तव दत्त यांना त्यावेळी बडोदा संस्थानच्या सेवेत जाणे शक्य झाले नाही. मात्र १९०४ मध्ये दत्त महाराजांच्या निमंत्रणावरून बडोदा सरकारचे महसूल मंत्री बनले आणि पुढे १ जून १९०९ रोजी बडोद्याचे दिवाणदेखील झाले.

"रोमेश चंद्र दत्त – बौद्ध धर्म – केळुसकर आणि महाराजा सयाजीराव" यांच्यातील बौद्ध धर्माच्या अनुषंगाने असणारे हे नाते फारच महत्त्वाचे आहे. १८९८ पूर्वीच सयाजीरावांचा बुद्धाशी चांगला परिचय होता याचा भक्कम पुरावा केळूस्करांच्या आत्मचरित्रात मिळतो. केळुस्करांच्या याच बुद्धचरित्रामुळे मॅट्रिक उत्तीर्ण झालेल्या बाबासाहेबांना बुद्धाचा पहिला परिचय १९०७ मध्ये झाला. त्यावेळी बाबासाहेबांचे वय अवघे १६ वर्षे होते. केळुसकरांचे हे 'बुद्धचरित्र' बुद्धाचा 'एक वैज्ञानिक दृष्टीचा महापुरुष' म्हणून वेध घेते. हे आधुनिक भारतातील फक्त मराठीतीलच नव्हे तर कोणत्याही भारतीय भाषेतील पहिले बुद्धचरित्र होते.

या बुद्धचरित्राचे बाबासाहेबांच्या वैचारिक जीवनातील आणि धर्मांतराच्या निर्णयातील क्रांतिकारक स्थान आपण जाणतोच. केळुसकरांचे हे बुद्धचरित्र वाचून बौद्ध धर्म स्वीकारलेले मुंबईचे ए. एल. नायर आधुनिक भारतातील बौद्ध धर्माच्या पुनरुज्जीवनात सयाजीराव महाराजांचे असणारे योगदान अधोरेखित करताना म्हणतात, "माझे महाराजांबद्दलचे

कौतुक अधिक तीव्र करणारी बाब म्हणजे भारतात बुद्ध धर्माचे पुनरुज्जीवन होण्याअगोदर महाराजांनी भगवान बुद्धामध्ये अतिशय उच्च प्रतीची रुची दाखविली. तसेच बुद्धाबद्दल अतीव प्रेम व्यक्त केले.” विशेष म्हणजे २ मे १९३१ ला मुंबई येथील डॉ. नायर यांच्या बुद्ध विहाराचे उद्घाटनसुद्धा सयाजीरावांच्याच हस्ते झाले होते. सयाजीराव महाराजांनी त्यांच्या अभ्यासिकेत अभ्यासाच्या टेबलावर बुद्धांची मूर्ती ठेवली होती. बौद्धिकदृष्ट्या सयाजीरावांचे आणि गौतम बुद्धाचे नाते किती जवळचे होते हेच यातून स्पष्ट होते.

पुढे ३० डिसेंबर १९३७ रोजी कलकत्ता येथे केलेल्या, बेंगाल बुद्धिस्ट असोसिएशनच्या स्वागतपर भाषणात सयाजीरावांनी मांडलेले विचार त्यांच्या बुद्ध प्रसाराप्रतीच्या तळमळीची साक्ष देतात. या भाषणाच्या अखेरीस सयाजीराव म्हणतात, “आपल्या संस्थेचे प्रचारक आमच्या संस्थानाकडे आपण पाठविल्यास मी त्यांचा यथायोग्य परामर्श घेईन आणि बौद्ध धर्माची खरी तत्त्वे जनतेत पसरावी म्हणून मला शक्य असेल ते सर्व प्रकारचे साहाय्य त्यांना देईन.”

## आधुनिक भारतातील पहिला : बडोद्यातील बुद्ध पुतळा

३१ डिसेंबर १९१० रोजी सयाजीराव महाराजांनी बडोद्यातील ज्युबिली बागेत बुद्धाचा पुतळा जपानहून आणून बसविला. या पुतळ्याच्या चबुतऱ्यावर बौद्ध धर्माची तत्त्वे कोरलेली होती. हा आधुनिक भारतातील बुद्धाचा पहिला पुतळा होता. या

पुतळ्याच्या अनावरण समारंभातील भाषणात, बुद्धाचे तत्त्वज्ञान स्पष्ट करताना महाराज म्हणतात, "महात्मा बुद्धांच्या उपदेशाचे सार एवढे होते की, मनुष्याला चांगली स्थिती प्राप्त होणे हे त्याचे नशीब किंवा दैवयोग यावर नसून, माणसाच्या पुरुषार्थावर अवलंबून आहे. आपण जसे कर्म करावे, जसा प्रयत्न करावा, त्या प्रयत्नाप्रमाणे लहानमोठे होऊ शकतो. बौद्ध सिद्धांताप्रमाणे ब्राह्मण - क्षत्रियादिवर्ण गुणकर्मावर समजला जातो. जन्मावरून नाही." महाराजांचे हे भाषण त्यांच्यातील समतावादी कृतिशील राजाचा परिचय करून देते. महत्त्वाचे म्हणजे उपलब्ध सर्व भारतीय धर्मात सयाजीराव बौद्ध धर्माच्या तत्त्वज्ञानातील वैज्ञानिक दृष्टीशी नाते जोडत होते याचा स्पष्ट पुरावा यातून मिळतो. महाराजांच्या भाषणांमध्ये वारंवार बुद्धाचे संदर्भ येतात. यावरून महाराजांना बौद्ध धर्म किती महतत्त्वाचा वाटत होता हे लक्षात येते.

बडोदा संस्थानात संस्थानातर्फे अधिकृतरीत्या बुद्धजयंती साजरी केली जात होती. बाबासाहेबांचा १९१३ पासून बडोद्याशी असणारा प्रत्यक्ष संपर्क विचारात घेता या पुतळ्यानेसुद्धा बुद्धाच्या समतावादाकडे नेणारी पायवाट बाबासाहेबांच्या उमेदीच्या वयात तयार केली होती असे दिसते. पीपल्स एज्युकेशन सोसायटीसाठीच्या ग्रंथखरेदीसाठी बाबासाहेब सिद्धार्थ कॉलेजच्या ग्रंथपालांना बडोद्याला पाठवत असल्याचे संदर्भ त्यांच्या चरित्रात सापडतात.

## धर्मानंद कोसंबी आणि महाराजा सयाजीराव

धर्मानंद आणि सयाजीराव यांच्या १९०६ पासूनच्या नात्याचा धागा बौद्ध धर्म हाच होता. १९०८ ते १९११ अशी तीन वर्षे बौद्ध धर्मविषयक ग्रंथलेखन करण्यासाठी आणि महाराष्ट्रात बौद्ध धर्म व पाली भाषेचा प्रसार करण्यासाठी महाराजांनी धर्मानंद कोसंबींना दरमहा ५० रुपयांची शिष्यवृत्ती दिली होती. पुढे १९५६ मधील बाबासाहेबांचे धर्मांतरसुद्धा या पार्श्वभूमीवर आपल्याला विचारात घ्यावे लागेल. १९०९ मध्ये धर्मानंदांनी बडोद्यात बौद्ध धर्मावर ५ भाषणे दिली. त्यातील ३ भाषणे 'बुद्ध, धम्म आणि संघ' या नावाने छोट्या पुस्तिकेच्या स्वरूपात आज उपलब्ध आहेत. या पुस्तकाच्या छपाईसाठी सयाजीरावांनी ५०० रु. ची मदत केली. १९१० मध्ये कोसंबींना अमेरिकेत हार्वर्ड विद्यापीठात प्रा.वॉरन यांच्या बौद्ध धर्मातील 'विशुद्धी मार्ग' या ग्रंथावरील संशोधनात सहकार्य करण्यासाठी बोलविण्यात आले होते. महाराजा सयाजीरावांची परवानगी घेऊन ते १९१० मध्ये हार्वर्ड विद्यापीठात गेले. ज्यावर्षी कोसंबी बौद्ध धर्मावरील संशोधनाला मदत करण्यासाठी अमेरिकेला गेले त्याचवर्षी महाराजांनी बडोद्याच्या ज्युबिली बागेत बुद्धाचा पुतळा बसविला होता.

ही अमेरिकावारी बौद्ध धर्माच्या कामासाठी व कोसंबींचा मुलगा दामोदर यांच्या शिक्षणासाठीसुद्धा फलदायी ठरली. हेच दामोदर कोसंबी पुढे भारतातील सर्वात महत्त्वाचे

प्राच्यविद्यापंडित म्हणून नावारूपाला आले. १९१२ मध्ये अमेरिकेहून परतल्यानंतर भारताला पहिल्यांदा मार्क्सवादाचा परिचय करून देणाऱ्या धर्मानंद कोसंबींच्या अमेरिकावारीला परवानगी देऊन सयाजीरावांचा हातभार लागला. कोसंबी पुढे एकूण चार वेळा बौद्ध धर्माच्या अभ्यासानिमित्त अमेरिकेला गेले. येथे अजून एका बाबीचा उल्लेख मनोरंजक ठरेल. ती बाब म्हणजे धर्मानंद आणि मार्क्सवाद होय. १९१२ मध्ये कोसंबींनी पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत कार्ल मार्क्सवर भाषण दिले. तो कार्ल मार्क्सचा भारताला परिचय करून देण्याचा पहिला सार्वजनिक प्रयत्न होता. कॉ.डांगे यांनी मार्क्सच्या विचारधारेवरील 'सोशॅलिस्ट' हे नियतकालिक १९२२ ला सुरू केले व १९२५ ला भारतीय मार्क्सवादी पक्षाची स्थापना केली. म्हणजे डांगेंच्या अगोदर दहा वर्षे कोसंबींनी मार्क्स भारतात आणला. कोसंबींना मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा परिचय अमेरिकेत झाला. म्हणजेच मार्क्स भारतात आणण्यामध्ये काही अंशी सयाजीरावांचा हातभार होता.

## पाली भाषा आणि महाराजा सयाजीराव

१९१२ मध्ये धर्मानंद कोसंबी अमेरिकेहून परतले व त्यांनी फर्ग्युसन कॉलेजमध्ये पाली भाषेचे प्राध्यापक म्हणून नोकरी स्वीकारली. विशेष म्हणजे ही नोकरी कोसंबींना मिळवून देण्यामध्ये विठ्ठल रामजी शिंदे यांचा मोठा वाटा होता.

महाराजांनी महाराष्ट्रात बौद्ध धर्म प्रसारासाठी बाबासाहेबांच्या धर्मांतरापूर्वी ५० वर्षे साहाय्य करून चांगली सुरुवात केली होती असे म्हणता येईल. यावेळी कोसंबींनी सयाजीरावांना फर्ग्युसन कॉलेजमध्ये पाली भाषा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती सुरु करण्याची विनंती केली. महाराजांनी कोसंबींची ही विनंती मान्य करून दरमहा पंधरा रुपयांच्या दोन आणि दहा रुपयाच्या दोन अशा चार शिष्यवृत्ती फर्ग्युसन कॉलेजमध्ये सुरू केल्या. या चार शिष्यवृत्ती १९१२ ते १९१८ या कालावधीत कोसंबी फर्ग्युसन कॉलेजमध्ये नोकरीत असेपर्यंत सुरू होत्या. विशेष म्हणजे मुंबई प्रांतातील पाली भाषा शिकवले जाणारे हे एकमेव कॉलेज होते. मुंबई प्रांतात पाली भाषेसाठी शिष्यवृत्ती सुरू करणारे सयाजीराव पहिले प्रशासक ठरतात.

महाराजांनी १९३० पासून बडोदा कॉलेजसह बडोदा हायस्कूलमध्येसुद्धा पाली भाषा शिकवण्याची व्यवस्था केली. कोसंबींचे फर्ग्युसन कॉलेजमधील विद्यार्थी चिंतामण वैजनाथ राजवाडे हे बडोदा कॉलेजमध्ये पाली भाषेचे पहिले प्राध्यापक होते. महाराजांच्या आज्ञेवरून प्राध्यापक राजवाडे यांनी ‘दीघनिकाय’ या बौद्ध ग्रंथाचे मराठीत भाषांतर करून तीन भागात प्रसिद्ध केले.

पाली भाषेच्या संवर्धनामागे सयाजीरावांची भूमिका महाराष्ट्राला परिचित नाही. पाली भाषेतील बौद्ध साहित्य बुद्धाच्या समतावादी तत्त्वज्ञानाच्या प्रसारासाठी महत्त्वाचे आहे हे

ओळखणारे सयाजीराव आधुनिक भारतातील पहिले प्रशासक आहेत. बडोद्याच्या सेन्ट्रल लायब्ररीमध्ये बुद्ध धर्मावरील जगातील सर्वोत्तम ग्रंथ उपलब्ध होते. आजही जगातील महत्त्वाच्या परंतु दुर्मिळ ग्रंथांच्या शोधात महाराष्ट्रातील अनेक विद्वान बडोदावारी करत असतात.

## बडोद्यातील प्राच्यविद्या आणि बौद्ध धर्म

१८८७ मध्येच महाराजांनी प्राच्यविद्या संस्थेच्या पायाभरणीला सुरुवात केली. प्रारंभीस ही संस्था बडोद्यातील मध्यवर्ती वाचनालयातील संस्कृत विभाग म्हणूनच कार्यरत होती. पुढे १९१५ मध्ये दुर्मिळ हस्तलिखितांचे प्रकाशन करण्यासाठी सयाजीरावांनी 'गायकवाड ओरिएन्टल सिरिज' या महत्त्वपूर्ण ग्रंथ मालेची सुरुवात केली. प्राच्यविद्येसंदर्भातील कामाची व्याप्ती विचारात घेऊन १ सप्टेंबर १९२७ रोजी 'बडोदा प्राच्यविद्या मंदिर' या स्वतंत्र दर्जा असणाऱ्या संस्थेची विधिवत सुरुवात महाराजांनी केली.

या प्राच्यविद्या संस्थेने बौद्ध धर्मावरील मूळ ग्रंथ प्रकाशित केले होते. महाराजांनी मराठीमध्ये बौद्ध धर्मावरील १७ ग्रंथ १९३६ पूर्वी म्हणजे बाबासाहेबांच्या धर्मांतराच्या निर्णयापूर्वी प्रकाशित केले होते. सयाजीरावांनी दामोदर यंदेंना ग्रंथ प्रकाशनात बौद्ध धर्मावरील मराठी ग्रंथांना अग्रक्रम देण्याची सूचना केली होती. १९२४ पासूनच बडोद्याच्या प्राच्यविद्या संस्थेने मूळ बौद्ध ग्रंथांच्या पुनर्मुद्रनाचे काम सुरू केले. बडोद्याच्या प्राच्यविद्या संस्थेने

प्रकाशित केलेल्या या ग्रंथांची संख्या १३ भरते. या ग्रंथांची केवळ नावे पाहिली तरी या क्षेत्रातील बडोद्याच्या प्राच्यविद्या संस्थेचे महत्त्वपूर्ण स्थान सहज लक्षात येते. धर्माबाबत वैज्ञानिक दृष्टीने घेतलेली भूमिका आणि तुलनात्मक धर्म अभ्यासाचा पाया या अधिष्ठानावर बौद्ध धर्मातील वैज्ञानिक दृष्टी आणि समतावाद यांच्याशी सयाजीरावांनी अगदी तरुणपणे स्वतःला जोडून घेत होते हे सिद्ध होते.

## सयाजीरावांनी प्रकाशित केलेले बौद्ध धर्मासंदर्भातील ग्रंथ:

१) दीघनिकाय भाग-१ : चिंतामण वैजनाथ राजवाडे, (१९१८)

२) जातकांतील निवडक गोष्टी, प्रथमार्ध : चिंतामण विनायक जोशी, (१९३०)

३) दीघनिकाय भाग २ रा : चिंतामण वैजनाथ राजवाडे, (१९३२)

४) बौध्दधर्म अर्थात धर्मचिकित्सा : रामचंद्र नारायण पाटकर, (१९३२)

५) भगवान बुध्दचरित्र व धर्मसार संग्रह : रामराव मार्तंड भांबुरकर, (१९३४)

६) बुद्धकालीन भारतीय समाज : ना.गो. कालेलकर, (१९३६)

७) Samarangana- Sutradhara (1924-25)

**८) Sadhanamala Vol. I - (Ed.) Benoytosh Bhattacahrya (1925)**

**९) Sadhanamala Vol.II - (Ed.) Benoytosh Bhattacahrya (1928)**

**१०) Asoka (Gaikwad Lectures) - Radhakumund Mookerji**

**११) Two Vajrayana Works - (Ed.) Benoytosh Bhattacahrya (1929)**

**१२) Tantrarahasya - (Ed.) Dr. R. Shamashatry (1930)**

**१३) Pre-Dinnaga Buddhist Texts on Logic from Chinese Sources – Guiseppe Tucci (1930)**

**१४) Guhyasamaj Tantra - (Ed.) Benoytosh Bhattacahrya (1931)**

**१५) Tattvasangraha of Santaraksita in two volume (1937-1939)**

**१६) Law of Vivada Cintamani (1943)**

**१७) Nispannayogavali -(Ed.) Benoytosh Bhattacahrya (1949)**

**१८) A Buddhist Bibliography**

**१९) Universities In Ancient India: D. J Apate.**

यातील भट्टाचार्य यांचा ‘टू वज्रयान वर्क्स’ हा ग्रंथ १९२९ मध्ये प्रकाशित करण्यात आला. या ग्रंथामध्ये तांत्रिक बौद्धवादाचा उगम आणि विकासाचा इतिहास मांडण्यात आला. त्याचबरोबर ज्ञानसिद्धी ग्रंथातील उपदेशाचे महत्व विशद करण्यात आले आहे. ‘गुह्यसमाज तंत्र अथवा तथागतगुह्यक’ हा भट्टाचार्यांनी संपादित केलेला मूळ संस्कृत ग्रंथ १९३१ साली गायकवाड ओरिएन्टल सिरिजमध्ये सर्वप्रथम प्रकाशित करण्यात आला. भारतातील तंत्र संप्रदायाशी संबंधित साहित्याच्या चिकित्सक अभ्यासातील या ग्रंथाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. इ.स तिसऱ्या शतकातील असंघ या बुद्धोत्तर महायानी पंथातील तत्त्वज्ञाच्या काळात लिहिलेल्या गेलेल्या तांत्रिक बुद्ध वादावरील ग्रंथापैकी हा एक महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. याचबरोबर ‘शक्तीसंगम तंत्र’ या ग्रंथाचा दुसरा खंड १९४१ मध्ये तर तिसरा खंड १९४७ मध्ये प्रकाशित झाला. ‘शक्तीसंगम तंत्र’हा ग्रंथ एकूण ४ खंडांचा होता. या ग्रंथाच्या दुसऱ्या खंडात ‘तारा खंड’ हे संस्कृत हस्तलिखित संपादित करण्यात आले. तर तिसऱ्या खंडात ‘सुंदरी खंड’ हे संस्कृत हस्तलिखित संपादित करण्यात आले. या दोन्ही संस्कृत हस्तलिखितांच्या विविध आवृत्या बडोद्याच्या प्राच्यविद्या संस्थेने बंगालची रॉयल एशियाटीक सोसायटी, नेपाळच्या ढाका विद्यापीठातील दरबार लायब्ररीतून संकलित केले होते.

## बडोद्याची ‘द गायकवाड स्टडीज इन रिलीजन अँड फिलॉसॉफी’ ग्रंथमाला

१९१८ मध्ये सुरू केलेली ‘द गायकवाड स्टडीज इन रिलीजन अँड फिलॉसॉफी’ ही ग्रंथमाला सुरू केली. तुलनात्मक धर्म अभ्यासावरील ही जगातील पहिली आणि आजअखेरची एकमेव ग्रंथमाला आहे. सयाजीरावांनी मराठी, गुजराथी, हिंदी आणि इंग्रजी भाषेत ८-१० ग्रंथमाला प्रकाशित केल्या, त्यापैकी ‘द गायकवाड स्टडीज इन रिलिजीन अँड फिलॉसॉफी’ ही ग्रंथमाला सगळ्यात वैशिष्ट्यपूर्ण होती. एका अर्थाने सयाजीरावांच्या विश्वबंधुत्ववादी दृष्टीची जगाला लाभलेली ही ‘बौद्धिक भेट’ होती. कारण या मालेच्या घोषणेतच ‘सहिष्णू भूमिकेतून आणि अलौकिक बुद्धिमत्तेच्या व्यासंगातून लिहिलेले ग्रंथच या मालेसाठी स्वीकारले जातील’ अशी स्पष्ट भूमिका आढळते.

या मालेतील सर्व ग्रंथ इंग्रजीत प्रकाशित झाले होते याची दोन कारणे असावीत. पहिले कारण हे असावे की यासाठीचे संशोधक आणि लेखक एक तर परदेशी होते किंवा इंग्रजीत लिहिणारे होते. दुसरे कारण म्हणजे हे ग्रंथ प्रकाशित करत असताना जगभरातील अभ्यासकांना डोळ्यासमोर ठेवून व्यापक भूमिकेतून ती तयार केली होती. तुलनात्मक धर्म अभ्यासाचे हे

‘साक्षरता’ अभियान मुख्यत: भारताला केंद्रबिंदू मानून तयार केले होते. जगातील सर्व प्रमुख धर्मांचा समावेश असणारी ही ग्रंथमाला इंग्रजी भाषेत प्रकाशित झाल्यामुळे जागतिक ‘संवाद’ निर्माण करण्यासाठी ती ‘मार्गदर्शक’ होती.

या मालेत पहिल्या वर्षी १९१८ मध्ये कोल्हापूरच्या करवीरपीठाचे शंकराचार्य कुर्तकोटी यांचा पीएच.डी. चा प्रबंध असणारा ‘द हार्ट ऑफ भगवद्गीता’ हा ग्रंथ प्रकाशित झाला होता. कुर्तकोटींनी हा प्रबंध अमेरिकेतील ओरिएंटल युनिव्हर्सिटीमध्ये पीएच.डी. पदवीसाठी सादर केला होता. हा ग्रंथही ३०० पानांचा आहे. टिळक भक्त असणाऱ्या कुर्तकोटींनी टिळकांचे ‘गीतारहस्य’ १९१५ ला प्रकाशित झाल्याच्या पार्श्वभूमीवर हे संशोधन केले होते. भगवद्गीतेवरील हे बहुधा पहिले संशोधन असावे.

या मालेत एकूण १७ ग्रंथ प्रकाशित करण्यात आले होते. या प्रत्येक ग्रंथ ३००-४०० पानांचा आहे. म्हणजेच सुमारे ७ हजार छापील पानांचा मजकूर या अध्यासनाने प्रकाशित केला. या मालेतील पुस्तकांची अनुक्रमणिका चाळली असता एक विषय घेऊन त्या विषयाबद्दल जगातील वेगवेगळ्या धर्मांमध्ये काय मांडणी केली आहे याची सखोल चर्चा आढळते. विशेष म्हणजे हिंदू, बौद्ध, इस्लाम, ख्रिश्चन, ज्यू या प्रमुख धर्मांबरोबरच ‘तुलनात्मक धर्मअभ्यास’ आणि ‘नीतिशास्त्र’ या विषयांवरील ग्रंथांचा त्यात समावेश होता.

या पार्श्वभूमीवर या मालेत प्रकाशित झालेला एक अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे 'अ बुद्धिस्ट बिब्लिओग्राफी' हा होय. या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे जगभर बौद्ध धर्माबाबत झालेल्या संशोधनाची सूची या ग्रंथात एकत्रित करण्यात आली आहे. हा ग्रंथ दोन खंडात असून पहिल्या खंडात पाली भाषेतील बौद्ध साहित्य, संस्कृत भाषेतील बौद्ध साहित्य, बौद्धेतर संस्कृत वाड्मयातील बौद्ध धर्माचे संदर्भ, युरोपियन भाषेतील बौद्ध साहित्याची चर्चा करण्यात आली आहे. या ग्रंथाच्या दुसऱ्या खंडात युरोपियन भाषेतील भारतीयांचे बौद्ध वाड्मय, श्रीलंका, ब्रह्मदेश, मलेशिया, जावा, कंबोडिया, हिमालयीन पट्ट्यातील, तिबेट, मध्य आशिया, मंगोलिया, चीन, कोरिया, जपान इ. १३ देशातील बौद्ध वाड्मयाचा आढावा घेणारी सूची देण्यात आली आहे. भारतातील अशा प्रकारचा बहुधा हा पहिला ग्रंथ असावा. या ग्रंथाच्या माध्यमातून महाराजांनी पुन्हा एकदा बौद्ध तत्त्वज्ञानाशी त्यांची असणारी बांधिलकी अधोरेखित केली आहे. हा ग्रंथ बुद्धाच्या जगभरातल्या स्वीकाराचा शोध घेणारा एक अद्वितीय प्रयत्न आहे. त्याचप्रमाणे महाराजांच्या धर्म साक्षरता अभियानातील एक महत्वाचा टप्पासुद्धा आहे. म्हणूनच ही ग्रंथमाला म्हणजे 'वैश्विक भान' जपणारा पहिला जागतिक धर्म साक्षरता उपक्रम ठरतो.

## बडोद्याचे बिनोयतोष भट्टाचार्य

बिनोयतोष भट्टाचार्य हे बौद्ध धर्मातील तंत्र संप्रदायावरील अधिकारी पंडित म्हणून जगविख्यात आहेत. १९२४ मध्ये सयाजीरावांनी त्यांना प्राच्यविद्या संस्थेच्या 'गायकवाड ओरिएंटल सिरिज'चे संपादक म्हणून बडोद्यात आणले. १९२७ त्यांना प्राच्यविद्या संस्थेचे संचालक केले आणि १९५२ ला भट्टाचार्य या पदावरून निवृत्त झाले. म्हणजेच एकूण २९ वर्षे हा बौद्धपंडित बडोद्यात होता. भट्टाचार्य यांचा 'टू वज्रयान वर्क्स' हा ग्रंथ १९२९ मध्ये प्रकाशित करण्यात आला. या ग्रंथामध्ये तांत्रिक बौद्धवादाच्या उगम आणि विकासाचा इतिहास मांडण्यात आला. त्याचबरोबर ज्ञानसिद्धी ग्रंथातील उपदेशाचे महत्त्व विशद करण्यात आले आहे.

भट्टाचार्यांना त्यांच्या विद्वत्तेचा सन्मान म्हणून महाराजांनी 'राजरत्न' व 'ज्ञानज्योती' या पदव्या दिल्या होत्या. मूळचे बंगालचे असणारे भट्टाचार्य 'बडोद्याचे भट्टाचार्य' म्हणून जगभर ओळखले जात होते. ब्राह्मणी, जैन आणि बौद्ध या तिन्ही धर्मांच्या तुलनात्मक अभ्यासातून त्यांनी बौद्ध धर्मातील तंत्र संप्रदायाचे अनन्य महत्त्व उजेडात आणले होते. ज्याप्रमाणे हिंदू तंत्र संप्रदायाने बौद्ध धर्मातील वज्रयानातून तांत्रिक संप्रदाय उसना घेतला आहे त्याचप्रमाणे महायान पंथातील तत्त्वज्ञांनी हेतुत: आणि जाणीवपूर्वक हिंदू देवता बौद्ध तंत्राशी जोडून घेतल्या. मध्ययुगीन हिंदू परंपरेतील शक्ती देवता आणि महायान पंथातील

'प्राज्ञ' या देवतांमधील साम्य भट्टाचार्यांनी शोधून काढले. त्यांचे हे सर्व योगदान एकूणच बौद्ध धर्माच्या बुद्धोत्तर तत्त्वज्ञानाचे महत्त्व अधोरेखित करते. म्हणूनच सयाजीरावांनी प्राच्यविद्या संस्था २९ वर्षे भट्टाचार्यांच्या ताब्यात का दिली होती याचा खुलासा होतो.

हिंदू धर्माला प्रतिक्रिया एवढा संकुचित विचार या जोडून घेण्यामध्ये नव्हता. कोणत्याही धर्माबद्दल टोकाचा द्वेषही नाही आणि टोकाचे प्रेमही नाही अशी अत्यंत संतुलित भूमिका घेत सयाजीरावांनी बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवन केले. वैयक्तिक जीवनात किंवा प्रशासकीय धोरणात त्यांनी कोणत्याही एका धर्माचा पुरस्कार कधीच केला नाही. तर धर्म स्वातंत्र्याबाबतचा व्यक्तीचा अधिकार आणि त्याची विवेकदृष्टी याचा महाराजांनी आदर केला. भारतातील आजच्या द्वेषजनक धार्मिक वातावरणात आणि प्रत्येक जातीच्या स्वजातकेंद्री संकुचित वृत्तीवर मात करण्यासाठी सयाजीरावांचा बौद्ध मार्ग हाच सर्वात परिपूर्ण पर्याय आहे. म्हणूनच नव्या पिढीने आता सर्वच धर्मांबाबतच्या परंपरावादी डबक्याची कोंडी फोडण्याच्या दिशेने प्रवास करणे म्हणजे सयाजीरावांचे कृतिशील अनुयायी होण्याचा प्रयत्न आहे. या भूमिकेतून काम करणे अपरिहार्य ठरते.

## सयाजीरावांचे बौद्ध कार्य आणि आंबेडकरांचे धर्मांतर

आधुनिक भारतातील बौद्ध धर्माचा अधिकृत इतिहास तपासला असता सयाजीरावांच्या बौद्ध धर्मविषयक पथदर्शक कामाचा उल्लेख एका शब्दातसुद्धा सापडत नाही. ही बाब

आपल्या चर्चाविश्वाच्या ‘बौद्धिक पक्षाघाता’ची साक्ष देते. आधुनिक भारतात बौद्ध धर्माचा पुनर्विचार कोणत्याही संकुचित भूमिकेशिवाय बौद्ध धर्माच्या वर्ण-जात विरोधी तत्त्वज्ञान आणि विज्ञानवादी दृष्टिकोनाच्या निकषावर करणारे सयाजीराव हे पहिले आहेत. ही बाब भारतीय समाजपरिवर्तनाच्या चळवळीने आजअखेर गंभीरपणे घेतली नाही. परिणामी जातीअंताची दिशा दाखवणारा बौद्ध धर्म आज बाबासाहेबांच्या महार जातीचा बौद्ध धर्म असा संकुचित जातीयवादी झाला आहे. ही बाब बाबासाहेबांनी ज्या उद्देशाने धर्मांतराचा निर्णय घेतला त्या क्रांतिकारक निर्णयाचा थेट पराभवच आहे. सयाजीराव हिंदू धर्माला प्रतिक्रिया म्हणून बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवन करत नव्हते, तर भारतातील हिंदू धर्म आणि जात यातील गुंतागुंतीच्या व्यवस्थेला पर्याय म्हणून बौद्ध धर्माला राजाश्रय देत होते. फुल्यांपासून आंबेडकरांपर्यंत हिंदूधर्माच्या टीकाकारांमध्ये सयाजीराव हे वेगळे ठरतात. कारण ते टोकाची नकारात्मक धर्मचिकित्सा टाळून तिचे सकारात्मक धर्मसाक्षरतेत परावर्तीत करतात.

सयाजीरावांच्या मृत्यूपूर्वी २ वर्षे त्यांनी स्टेनले राईसच्या ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावनेत तुलनात्मक धर्म अभ्यासाची गरज पुढीलप्रमाणे व्यक्त केली आहे. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत महाराज म्हणतात, “जर हिंदूंना त्यांच्या धर्माचा इतिहास शिकवला आणि त्यांच्या धर्माची इतर धर्माशी तुलना करण्याची कुवत त्यांच्यामध्ये निर्माण केली तर ती अतिशय चांगली बाब

ठरेल. यामुळे लोकांची मनोवृत्ती अधिक व्यापक होऊन त्यांच्या विचारामध्ये अधिक उदारता येईल. यामुळे त्यांच्या प्रगतीला उत्तेजन मिळेल.” सयाजीरावांची ही भूमिका त्यांचा धर्म साक्षरता प्रकल्प अधोरेखित करते.

सयाजीरावांच्या धर्मसाक्षरता धोरणाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला कळते की, त्यांनी बौद्ध धर्माला एवढा राजाश्रय का दिला होता. सयाजीरावांनंतर एवढ्या व्यापक भूमिकेतून बौद्ध धर्माचा विचार करणारा आणि बौद्ध धर्माचा प्रसार करणारा दुसरा प्रशासक भारताच्या इतिहासात सापडत नाही. म्हणूनच बाबासाहेबांच्या बौद्ध धर्मचिंतनाअगोदर सयाजीरावांचे बौद्ध धर्मचिंतन भारताने स्वीकारले असते तर बौद्ध धर्माच्या स्वीकाराचा पाया अधिक व्यापक झाला असता. आपला समाज जातीच्या पलीकडे जाऊन जास्त ‘संवादी’ झाला असता एवढे मात्र नक्की.

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव ‘प्रजासत्ताक’ राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सयाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

# महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



**❐ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**मराठी :**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**English**

- Spechess & Adresses : 2 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- World Tour Reports : 3 Books
- Biographies : 5 Books
- Letters : 4 Books
- Administration : 1 Books
- Education Reforms : 3 Books
- Total English Books : 20

**हिन्दी :**

- सयाजीराव का लेखन : १
- सयाजीराव जीवनी : २
- पत्र संग्रह : ३
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- भाषण संग्रह : २
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
  कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि.,११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाली आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com